दै. गोदातीर दि.

# सात वर्षांनंतर घर सोडून गेलेला व्यक्ती विमानतळ पोलिसांच्या मदतीने नातेवाईकांच्या स्वाधीन



नांदेड (प्रतिनिधी) – शहराच्या शारदानगर भागात राहणारा एक व्यक्ती सात वर्षापासून मुलाखतीला जातो म्हणून घर सोडून गेला होता. तेव्हा त्याची पत्नी तीन महिन्यांची गरोदर होती. विमानतळ पोलिसांनी त्याला शोधल्यानंतर आपल्या माघारी जन्मलेल्या मुलीला पाहिल्यानंतर त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहायला लागले. पण सात वर्षानंतर एका मिसींग प्रकरणाचा शोध लागला हे महत्त्वाचे आहे.

१७ मे २०१९ रोजी शहरातील शारदानगर येथील गणेश संभाजी भारसावडे यांनी दिलेल्या माहितीनुसार ५ नोव्हेंबर २०१८ रोजी शारदानगरमधून त्यांचा मुलगा नवनाथ गणेश भारसावडे (वय २६) हा लग्न झाल्यानंतर तीन महिन्यांनी निघून गेला. त्यावेळी त्याची पत्नी तीन महिन्यांची गरोदर होती. मुलाखतीला जात आहे म्हणून घरातून निघून गेला तो आलाच नाही. या संदर्भाने विमानतळ पोलीस ठाण्यात मिसींग क्रमांक १६/२०१९ दाखल होता. या गुन्ह्याचा तपास सध्या पोलीस अंमलदार शेख जावेद यांच्याकडे आहे.

पोलिसांच्या गुप्त माहितीदार आणि सायबर सेलच्या मदतीने त्याचा शोध सुरू होता. तेंव्हा त्यांना सात वर्षापूर्वी घरातून गेलेल्या नवनाथ भारसावडेचा शोध पनवेल, नवी मुंबई येथे लागला. पोलीस पथक तेथे गेले आणि त्याला घेवून नांदेडला आले. आई- वडील, पत्नी आणि मुलगी यांना पाहुन त्याच्या डोळ्यात आश्रू वाहू लागले. ही कार्यवाही पोलीस निरीक्षक चितांबर कामठेकर, सायबर सेलचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, पोलीस अंमलदार जावेद, राजू कांबळे, राजेश माने, शेख शोयब, पाकलवाड, वाडकर, नंदगावे, टीमके, दीपक ओढणे यांनी केली.

दै. पुढारी.

# रेड्यांची क्रूर वाहतूक; ९ लाखांचा मुद्देमाल ज

## रामतीर्थ पोलिसांची कारवाई; एकावर गुन्हा द

**नायगाव, पुढारी वृत्तसेवा :** नरसी-बिलोली रोडवर सोमवारी रात्री रामतीर्थ पोलिसांनी मोठी कारवाई करत चौदा टायरच्या ट्रकमधून रेडे क्रूरपणे कोंबून नेणारा ट्रक पकडला. या कारवाईत १४ जनावरांसह सुमारे ९ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, हरियाणातील आरोपी ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर ट्रक (क्रमांक एचआर-३९-बी-६०९८) हा महेशकुमार सैनी, रा. हिस्सार (हरियाणा) याच्या ताब्यात होता. या ट्रकमध्ये असंख्य म्हशीचे रेडे एकमेकांना इजा होईल अशा दाटीवाटीने व क्रूरपणे कोंबले होते. आणखी काही वेळ ही जनावरे अशीच राहिली असती तर अनेकांचा जिव गेला असता. जनावरांना अन्नाची कोणतीही नसल्याचेही तपासात नि दरम्यान, सहायक पोलि विक्रम हराळे मार्गदर्शनाखालील गस्तीदरम्यान सदर ट्र तपासणी केली असता अमानुष वाहतुकीचा प्र आला. या कारवाईत १ व चौदा टायरचा ट्रक लाख ४० हजारांचा करण्यात आला. या महेशकुमार सैनी या क्रूर वाहतूक प्रति रामतीर्थ पोलिस नोंदविण्यात आला जमादार सोनकांबळे